# देसाई कुटुंबीयांकडून विद्यापीठाला धनादेश

## पर्यावरणशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास 'डॉ. निलीशा देसाई' पारितोषिक देण्याची विनंती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक केंद्रात कार्यरत असणाऱ्या व पर्यावणप्रेमी डॉ. निलीशा देसाई यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एम. एस्सी. भाग दोन पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला 'प्रा. डॉ. निलीशा प्रकाश देसाई' पारितोषिक द्यावे. यासाठी देसाई कुटुंबियांनी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे ३ लाखाचा धनादेश सुपुर्द केला.



कोल्हापूर : पारितोषिकासाठीचा धनादेश कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपुर्द करताना प्रकाश देसाई. सोबत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, अमित कुलकर्णी, उदय गायकवाड, श्रीकांत देसाई, अशोक देसाई आदी.

डॉ. निलीशा देसाई यांचा मंगळवारी वाढदिवस होता. या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. देसाई यांच्या कमाईतील शिल्लक असलेली ३ लाखाची रक्कम त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे सुपुर्द केली. डॉ. देसाई या पर्यावरणशास्त्र विषयाच्या संशोधक विद्यार्थीनीही होत्या. त्यांचा पर्यावरणात अभ्यास असल्याने याच विभागाच्या विद्यार्थ्याला या ३ लाखामधून पारितोषिक मिळावे, अशी भावना देसाई कुटुंबियांनी व्यक्त केली आहे. पर्यावरणशास्त्र विषयाचे हे पहिलेच पारितोषिक ठरेल. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, पर्यावरणप्रेमी उदय गायकवाड, श्रीकांत देसाई, अशोक देसाई व देसाई कुटुंबियांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

# अपघातग्रस्तांना माणुसकीचा हात हवा

कोल्हापूर

रस्त्यावर अपघात झाल्यानंतर जखमींना बहुतांशवेळा मदत मिळत नाही. यामुळे कधी-कधी जखमींना प्राणही गमवावा लागतो. म्हणून देशातील सजग नागरिक म्हणून रस्त्यावरील अपघातात जखमी झालेल्यांना मदतीचा हात देवून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे, असे आवाहन महाराष्ट्र अस्थिरोग संघटना कोल्हापूरचे अध्यक्ष डॉ. प्रदीप पाटील यांनी केले.

**डॉ. प्रदीप पाटील यांचे आवाहन**

महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचा १ मे रोजी वर्धापण दिन आहे त्यानिमित विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, रस्त्यावर अपघात होतात. पण पोलीस यंत्रणेसह इतर गोष्टींना सामोरे जावे लागेल अशी लोकांच्या मनात भीती असल्याने, अपघात झाल्यानंतर जखमी व्यक्तीला नागरिक मदत करीत नाहीत. पण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता अपघातामधील जखमींना मदत करताना अडचणी येणार नाहीत. त्यामुळे जखमींना मदत करण्यास लोकांनी पुढे यावे.

या कार्यक्रमात महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ. नितीन देशपांडे यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेतला.

डॉ. संग्राम मोरे यांनी अत्यावश्यक सुविधा व रुग्ण वाहिकेबद्दल माहिती दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. आरती जाधव, डॉ. संदीप कदम, डॉ. उमेश जैन आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय व्टिटूर परीषदेचे उद्घाटन करताना प्रा. पी. एस. पाटील, डॉ. पी. के. पाटील, प्राचार्य व्ही. एस. पाटील आदी.

# ट्विटर परिषदेमुळे जग एका क्लिकवर

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतातील पहिली ट्विटर कॉन्फरन्स कोल्हापुरात श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाउसच्या न्यू कॉलेज मध्ये आयोजीत करण्यात आली. यामुळे जगभरातील शास्त्रज्ञ एका क्लिकवर एकमेकांशी संवाद साधत आहेत असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील यांनी केले.

न्यू कॉलेजमध्ये 'नॅनोबायो-१९" या विषयावरील चार दिवसीय आंतरराष्ट्रीय ट्विटर परीषदेस प्रारंभ झाला. त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स. शिवाजी मराठा बोर्डींगचे संचालक प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते.

**प्रा. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन**

डॉ. पाटील म्हणाले, सर्व शाखेच्या संशोधकांनी एकत्र येवून काम केल्यास भारताचे भवितव्य उज्ज्वल आहे. अशा वेगळ्या धर्तीच्या परिषदेच्या आयोजनामुळे न्यू कॉलेजचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे असे गौरवोद्‌गार पाटील यांनी काढले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शुभ संदेश ट्विट करण्यात आला.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींगचे चेअरमन डी. बी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन करण्यात आले. परीषद यशस्वी करण्यासाठी डॉ. ए. डी. चौगले, एस. बी. परीट, डॉ. एन. व्ही. पवार, डॉ. पी. बी. पाटील, डॉ. व्ही. आर. मोरे, प्रबंधक एच. के. सोनाळकर आदी उपस्थित होते.

लोकमत

# तामिळ विद्यापीठाशी पाच वर्षांसाठी करार

संदीप आडनाईक ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि तामिळ विद्यापीठासोबत होणाऱ्या या ऐतिहासिक सामंजस्य करारानुसार दोन्ही विद्यापीठे एकमेकांना सहकार्य करणार आहेत. हा करार पाच वर्षांसाठी असून, संबंधिक समितीने यापूर्वीच कागदपत्रे जपणुकीसंदर्भात चार ठिकाणांची निवड केली आहे.

**अहद् तंजावर, तहद् पेशावर | भाग ४**

तामिळ विद्यापीठ, तंजावर येथील मोडी हस्तलिखितांचे मराठीकरण करून अतिमहत्त्वाच्या जवळपास साडेसात लाख मोडी हस्तलिखितांचे जतन, संवर्धन करण्यासाठी पूर्वतयारी करून त्याची साफसफाई, कागदपत्रांची विषयवार सूची, ती कागदपत्रे डिजिटायझेशन आणि मराठीकरण करून ते प्रकाशित करणे या कराराचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. (समाप्त)

## करारातील कलमे

१. तंजावर मराठ्यांच्या इतिहासात तसेच संस्कृतीमधील योगदानाबाबत शिवाजी विद्यापीठामध्ये संग्रहालयाच्या माध्यमातून प्रदर्शन भरविणे, यासाठी तामिळ विद्यापीठाचे अधिकारी सहकार्य करतील.

२. दोन्ही प्रांतामधील संस्कृतीच्या कागदपत्रांची देवाण-घेवाण होईल. दोन्ही विद्यापीठांत दोन्ही प्रांतांतील तज्ज्ञ व्याख्यान देतील. तसेच संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करतील.

३) हा करार पाच वर्षांसाठी करण्यात येईल. आवश्यकतेनुसार पुन्हा पाच वर्षे वाढविण्यात येईल.

४) कुलगुरु आणि प्रकुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली दोन्ही विद्यापीठांकडून कराराची अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल. यासाठी समन्वयक नेमला जाईल. विद्यापीठांच्या संयुक्त कार्यक्रमांचे तो संचालन करेल.



राज्य मराठी विकास संस्था (मुंबई) मार्फत १९ जुलै २०१८ रोजी तंजावरला भेट देण्यात आली. यावेळी तामिळ विद्यापीठाचे डॉ. विवेकानंद गोपाळ, भास्कर बाजड, गणेश नेर्लेकर-देसाई, प्रकल्प संचालक डॉ. आनंद काटीकर, डॉ. अशोक सोलणकर, पांडुरंग बलकवडे, डॉ. कै. अंथियमान उपस्थित होते.

५) दोन्ही विद्यापीठांत अध्यासनाची स्थापना करण्यात येईल. दोन्ही राज्य सरकारांकडे संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु या अध्यासनाचे प्रस्ताव पाठवतील.

६) तंजावरमधील दोन प्रांतांच्या संस्कृतीचा अभ्यास करणे, यामध्ये दोन्ही प्रांतामधील मराठा इतिहासाशी संबंधित विशेषत: सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, भाषांतर आणि प्रकाशनाचा समावेश आहे.

७) दख्खनी मराठी भाषेचा विकास तंजावर मराठ्यांमध्ये कसा झाला, या अनुषंगाने अभ्यास करणे.

८) तामिळ, तेलगू आणि इतर दक्षिणी भारतीय भाषेवर मराठीचा कसा प्रभाव पडला, तसेच मोठ्या संख्येने मूळ मराठी शब्दांचा वापर व जपणूक तसेच दख्खनी मराठी भाषेत मोठ्या संख्येने निर्माण झालेल्या मराठी साहित्याचा अभ्यास करणे.

लोकमत



कोल्हापुरातील शिवाजी पेठेतील न्यू कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचे उद्घाटन प्रा. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. पी. के. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# ट्विटर परिषदेने न्यू कॉलेज आंतरराष्ट्रीय स्तरावर

## नॅनोबायो विषयावर चार दिवसीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतातील पहिल्या ट्विटर परिषदेमुळे जगभरातील शास्त्रज्ञ सोशल मीडियावर एकमेकांशी संवाद साधत आहेत. अशा वेगळ्या धर्तीवर परिषद आयोजनामुळे न्यू कॉलेज आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील यांनी केले.

न्यू कॉलेजमध्ये 'नॅनोबायो-१९' या विषयावरील चारदिवसीय आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते.

प्रा. पाटील म्हणाले, आंतरशाखीय संशोधन करणे ही जागतिक संशोधक समुदायासमोरची आद्य प्राथमिकता असायला हवी. नॅनोबायोसारख्या नवसंशोधन शाखेमुळे संशोधनाची दिशाच बदलून टाकली आहे. येणारे शतक हे या नवशाखेचे असणार आहे. ही परिषद प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन डी. बी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. यासाठी डॉ. ए. डी. चौगले, एस. बी. परीट, डॉ. एन. व्ही. पवार, डॉ. पी. बी. पाटील, डॉ. व्ही. आर. मोरे, प्रबंधक एच. के. सोनाळकर यांनी परिश्रम घेतले.